# ॐ मंत्राचे रहस्य

## (आकार, उकार, मकार)

(डॉ. व्ही. टी. इंगोले)

ॐ हा एक लिखित मंत्र म्हणजे मुळाक्षर ( Symbol, Icon, alphabet) आहे. त्याला अकार-उकार-मकार, ओंकारा आणि इतर अनेक प्रकारे संबोधिले जाते. हिंदू धार्मिकदृष्ट्या याला अनन्य साधारण महत्व आहे. याला त्रिमूर्ती म्हणजे ब्रम्हा, विष्णू, महेश्वरा तसेच उमा म्हणजे देवी पार्वती म्हणून पण संबोधिले जाते. ' ॐ तत सत' म्हणजे हेच अंतिम सत्य आहे- हा हिंदू प्रणालीचा एक महत्वाचा उपदेश आहे. वेदातील श्लोक यानेच सुरु होतात. इतर पंथ, धर्म जसे बौध्द, जैन यांच्या धर्म मंत्रात याचा उल्लेख होतो. सिख पंथाच्या ध्वजावर तर हाच मंत्र बिम्बित आहे.

आता आपण या मंत्राकडे वैज्ञानिक दृष्टीने याच्या उच्चाराकडे बघूया. औम (ॐ) हा सिंधू संस्कृतीतला अत्यंत पवित्र मंत्र आहे. आम्ही जेव्हा या मंत्रातल्या रहस्याबद्दल काम सुरु केले तेव्हाची गोष्ठ. माझ्या विद्यार्थ्यांना 'ओम' चा उच्चाराचा कंपन आलेख (frequency spectrum band) प्रत्येक व्यक्तीमध्ये वेगवेगळा असतो की काय याचा अभ्यास करायचा होता. त्यासाठी त्याचा उच्चार कसा करायचा याचा अभ्यास सुरु केला. कळले की लिखित शब्दा प्रमाणे जसा- औम, ओम, ओऊम इत्यादी. उच्चारताना शरीरात तरंग (Note) न येता कंपन (Vibration) होतात. असे आम्हाला अपेक्षित नव्हते. 'ओ' उच्चारतांना स्वर यंत्रात तंतू पेशीचा उपयोग करावा लागतो तेव्हा कंठ ताणरहित (रिल्याक्स) नसतो असे कळले. त्याच बरोबर तसे उच्चारतांना अन्न नलिकेत तसेच कानामधे कंपने निर्माण होतात पण तरंग नसतात . कंपन म्हणजे अनेक तरंगाचे एकत्रीकरण (combination) आणि तरंग म्हणजे शुद्ध नाद, सूर जसा बासरीतून येतो. परंतु 'हो' उच्चारताना मात्र तरंग निर्माण होतात आणि ते कार्नेन्द्रीयाला ऐकू येत नाहीत. आमच्या अनेक प्रयोगातून कळले की औम शब्दाचा उच्चार पद्धतीने 'हो s s ओऊ s मं ss ह' केल्याने तरंग निर्माण होतात. 'हो' उच्चारतांना स्वरयंत्रांवर ताण नसतो आणि फुफ्फुसा सोबत अन्ननलिका आणि त्याच बरोबर गळ्याखालील शरीर (TORSO) तरंग पावते तर शीर (डोके, HEAD) शांत म्हणजे तरंग विरहीत असते. तसेच 'ओऊ' उच्चारतांना मुखासोबत (oral cavity) शरीरात तरंग सुरु होतात. 'मं' उच्चारतांना नासिका आणि डोक्यात तरंग सुरु होतात. शेवटी 'ह' उच्छ्वास असतो. या मंत्राचा उच्चार करतांना शरीरातील तरंग खालील शरीरातून डोक्यापर्यंत क्रमाक्रमाने निर्माण होतात आणि पूर्ण शरीराचा तरंग आलेख मिळतो. या प्रयोगावरून असे कळले की प्रचलित लिखित शब्द (spelling) आणि उच्चार (pronunciation) यात किंचित फरक आहे. खरा शब्ध " हो s s ओ ऊ s मं s s s ह" असा असावा, जसा हौम-हवन मधील 'होउम' असे आमच्या प्रयोगाने दर्शित केले. औम (ॐ) चा तरंग आलेख हा प्रत्येक व्यक्तीमध्ये एक

विशेष आलेख (unique frequency spectrum) असतो. जशा हातावरील रेषा आणि त्यावरून त्या व्यक्तिची ओळख ( identity) कळू शकते. पुढील विश्लेषण करताना असे आढळलेकी प्रत्येक व्यक्तीने उच्चारलेल्या सर्व शब्दात फुफ्फुस आणि अन्ननलीकेत 'ह' स्वराचे आंदोलन अभिप्रेत असते. 'ह' हा एक शुद्ध स्वर म्हणजे तरंग, आंदोलन ( Simple Harmonic Motion SHM) आहे. त्यामुळेच ॐ मंत्रामध्ये 'ह' ला अनन्य साधारण महत्त्व दिलेले असावे. शारीरिक व्याधीमुळे विशिष्ट व्यक्तीच्या 'ह' आंदोलनामध्ये फरक पडू शकतो आणि हेच वरील संशोधानामागील कारण. औम (ॐ) मंत्रावर अनेक प्रबंध लिहिल्या गेलेत. असेही प्रयोग होत आहेत ज्यामध्ये एका व्यक्तीच्या कंपन आलेखा (frequency spectrum) मध्ये झालेल्या बदलावरून त्याचे रोग निदान करणे आणि याच मंत्राच्या उच्चाराने त्याचे रोग निर्मूलन करणे वगैरे. अजून पर्यन्त तरी याला पूर्ण शास्त्रीय मान्यता मिळालेली नाही.

आता ॐ शब्दाच्या निर्मिती बद्दल विचार करूया. आम्ही सहा निसर्गवेडया संशोधकांनी २००६ मद्धे अश्म युगातील (Upper Paliolithic, 15000 BC) अति प्राचीन मानवी संस्कृतीचा शोध लावला हे सर्वश्रुत आहे. या स्थळी आदिमानवाने तब्बल १३००० ते १५००० वर्षे वसती केली हे प्रमाण सहित सिद्ध झाले आहे. भारतात आदिमानवाचे हेच पहिले वसतीस्थान म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही . कारण हा २१ व्या शतकातील अत्यंत महत्वाचा शोध म्हणून भारतीय पुरातत्व विभागाने ( Archaeological Survey of India) म्हटले आहे. येथे आम्ही अनेक चित्रित ( Rock paintings) शैलगृह (Rock Shelter) शोधलीत. एका शैलागृहात ॐ काढलेले आढळले. ब्राम्ही लिपीत कोरलेले शिलालेख दिसले. स्वस्तिकाचे चिन्ह दिसले. त्यात सर्वात महत्वाचे म्हणजे पुजलेले लिंग, तसेच दगडावर कोरलेले अनेक स्त्रीचे जननेंद्रिय आढळले.






सिंधू संस्कृतीमध्ये स्त्रीलींगासारख्या चिन्हाला 'म' संबोधील्या जाते. ते चिन्ह मस्य (मीना) सारखे दिसते.



वरील चिन्हावरून कळते की  स्त्रीलींगाला तत्कालीन समाजात  देवते समान 'मा' संबोधिल्या जायचे. आजही स्त्रीलींग पूजा केली जाते आणि तशी अनेक देवालये आहेत.  स्त्री जननेंद्रिय म्हणजे सर्व चल जीवांमध्ये उत्पत्तीचे मूळ अवयव.   त्यामुळे त्या अवयवाला  अनन्य साधारण महत्व दिल्या गेले असावे. यात प्रामुख्याने असा  उल्लेख करावासा वाटतो की , त्या जन्म देणारीला जगभरात 'म:XXX ' नेच संबोधतात.  जसे संस्कृतमध्ये मातृ, लॅटीनमध्ये मातर ( mater), मोदोर, मात, वगैरे.   स्त्रीलींगाच्या प्रतिकृतीची (चिन्ह) पूजा म्हणजे उत्पत्तीची पूजा.  स्त्रीलींग म्हणजे  म: देवीचे म्हादेव ते महादेव तसेच  स्त्रीलींगाच्या चित्राचे शिवलिंग मूर्ती म्हणजे महादेवाच्या पिंडीत कालयोगाने निर्मिती कशी झाली असेल हे खालील चित्रावरून स्पष्ट होते. कोरले ले स्त्रीलींग (मुळाक्षर म:) ( 2 dimensional) जेव्हा मूर्तीत ( 3 dimensional) परिवर्तीत झाले या मद्दे वर्त्लाचे लिंग झाले हे दर्शित होते. यान कालांतराने पुरुष प्रधान संस्कृतीचा प्रभाव असावा आणि 'म: देवीचा' महादेव झाला असावा यात शंका वाटत नाही. महादेवाच्या पिंडीमध्ये  क्रमवार कालानुरूप कसे बदल झाले असावेत, ते खालील प्रकारे.



अनेक लिपीत (लिखित अक्षरात) 'म:' या  चिन्हाचा  मुळाक्षर म्हणून वापर करण्यात आला. त्याचा  क्रमवार बदल कसा झाला हे खाली दिले  आहे.



तेलुगु, तमिळ, कन्नड, ओर्रिया या लिपीत ते चिन्ह हे मुळाक्षरचे  मुख्य वळण (foundation) असावे हे  वरील उत्पत्ती आलेखा वरून स्पस्ट दिसून येते. तसेच लॅटीन लिपीत 'ओमेगा'

(उच्चार ओम शी मिळता जुळता) हे मुळाक्षर सुद्धा त्यातलाच एक प्रकार असावा.



आता आपण ॐ या चिन्हाच्या उत्पत्ती कडे वळूया. हे चिन्ह एकूण चार (४) चिन्हाचे मिळून झाले आहे. सिंधू भारतीय संस्कृती प्रमाणे ॐ म्हणजे पूर्ण विश्व ( cosmos). त्यात वेळ (time), अवकाश (space) आणि ऊत्पत्ती(creation) या तीन मूळ तत्वांचा एक अभूतपूर्व संगम आहे. त्यात अवकाश ( space) आणि काळ मापन ( time) हे सूर्य ( दिवस), चंद्र (महिना), आणि तारे (वर्ष) या द्वारे क्रमवार दर्शविले आहेत आणि ऊत्पत्ती ( creation) ही स्त्रीलींगाव्दारे दर्शविली आहे. म्हणूनच हा मंत्र स्वयंपूर्ण आहे.



म: ची क्रमवार उत्पत्ती






सूर्य आणि चंद्र हे ठळकपणे (O) गोल म्हणजे इंग्रजी ‘ओ’ प्रमाणे दिसतात. ‘हो’ तसेच ‘ओ’ म्हणतांना ओठांचा गोल (इंग्रजी ‘O ओ’ प्रमाणे) करावा लागतो.

सद्य देवनागरी लिखाणात आपण डावीकडून उजवीकडे वाचतो. सिंधू लीपिमात्र उजवीकडून डावीकडे लिहिल्या जात होती असा पुरावा आहे. देवनागरी प्रमाणे ॐ चा उच्चार हा 'म:हो' (maho) असा होतो तर सिंधू लिपी प्रमाणे होम: ( hom) असा होतो. ह्या मंत्राचा उच्चार उजवीकडून डावी कडे वाचल्यावर त्यातील शब्द आणि उच्चार यातील परस्परातील समन्वयाचे रहस्य आम्हाला कळले. यावरून ॐ हा अति प्राचीन सिंधू संस्कृती मधील मंत्र आहे हे सिद्ध होते. तसेच ॐ मंत्राचे महात्म्य मोहेंजोदारो-हरप्पा संस्कृतीतून सर्व जगभर पसरले असावे आणि जगभरातील अनेक राष्ट्रध्वजामध्ये ॐ चीन्हातील सूर्य, चंद्र, तारा तसेच चंद्र-तारा इत्यादीचा अंतर्भाव केला असावा. अधिक खोल निरीक्षणावरून नेपाल राष्ट्राचा ध्वज हा इतरांप्रमाणे चौकोणी नसून आडव्या इंग्रजी ' M' म्हणजे ॐ मधील म: सारखा आहे. नेपाल राष्ट्राचा ध्वजामध्ये म: ( ∑) तर सूर्य ( O), चंद्र ( U) आणि तारा ( *) समाविष्ट करून पूर्ण ॐ चा संपूर्ण साक्षात्कार केला आहे. तसेच हिंदू धर्माचा, महाराष्ट्राचा म्हणजे शिवरायाचा ध्वज याच प्रकारात मोडतो असे वाटते. अशा या अदभूत मंत्राचा अविष्कार सिंधू (हिंदू) संस्कृतीने ३००० ते ४००० वर्षापूर्वी सर्व जगाला द्यावा , ही आपल्या सर्वांना अभिमानाची गोष्ट आहे.


-डॉ.विजय इंगोले,

Director

Dr. Rajendra Gode Institute of Technology & Research

Amravati

9422156677

vtingole@gmail.com


. . . . .